महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १५३ वे | दिनांक : २७/०५/२०२६ | वार : बुधवार

## विधानपरिषदेच्या १२ जागांसाठी ४८ नावांची यादी!: प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण अमित शहांच्या भेटीला



**मुंबई** : राज्यातील विधानपरिषदेच्या १७ जागांसाठी निवडणुकांची घोषणा झाली असून उमेदवारी अर्ज भरण्यासही सुरुवात झाली आहे, या निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा थेट सामना पाहायला मिळणार आहे. महायुतीमध्ये सध्या १२-५-२ असा जागावाटपाचा फॉर्म्युला ठरल्याची चर्चा असून, त्यानुसार भाजप १२, शिंदेंची शिवसेना ५ आणि राष्ट्रवादी काँग्रेसला २ जागा मिळण्याची शक्यता आहे. यासंदर्भात अद्याप अंतिम निर्णय झाला नसला तरी तिन्ही पक्षांचे प्रमुख लवकरच एकत्र बैठक घेऊन जागावाटपावर शिक्कामोर्तब करणार आहेत.

दरम्यान, भाजपने आपल्या कोट्यातील १२ जागांसाठी जोरदार तयारी सुरू केली असून उमेदवारांच्या नावांची प्राथमिक यादीही निश्चित केली आहे, ज्या अंतर्गत तब्बल ४८ संभाव्य नावांची यादी घेऊन भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आज दिल्लीला रवाना होत आहेत. विधान परिषदेच्या उमेदवार निश्चितीसाठी भाजपमधील राजकीय हालचालींना प्रचंड वेग आला असून, आगामी २ ते ३ दिवसांत उमेदवारांची अंतिम नावे जाहीर केली जाणार आहेत. याच पार्श्वभूमीवर, विधान परिषदेच्या एकूण १२ जागांसाठी तब्बल ४८ संभाव्य उमेदवारांच्या नावांची यादी घेऊन भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आज दिल्लीला रवाना होत आहेत. आपल्या या दिल्ली दौऱ्यात रवींद्र चव्हाण भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेणार असून, त्यांच्यासोबत या नावांवर सविस्तर चर्चा करून उमेदवारांची यादी अंतिम करणार असल्याचे समजते.

विधानपरिषद निवडणुकांसाठीचा महायुतीमधील जागावाटपाचा फॉर्म्युला, भाजपच्या संभाव्य उमेदवारांची नावे आणि इतर महत्त्वपूर्ण बाबींची तपशीलवार माहिती या दौऱ्यात केंद्रीय पक्ष नेतृत्वाला दिली जाणार आहे. विशेष म्हणजे, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या या दिल्ली दौऱ्यातच भाजपच्या १२ उमेदवारांची नावे अंतिम केली जाणार असून, उमेदवारी अर्ज भरण्यासाठी १ जूनपर्यंतचीच मुदत असल्याने पुढील २ ते ३ दिवसांत या नावांवर शिक्कामोर्तब होण्याची दाट शक्यता आहे. जेणेकरून नावे निश्चित होताच संबंधित उमेदवारांना तातडीने निवडणुकीच्या तयारीला लागण्याचे आदेश पक्षाकडून दिले जातील.

विधानपरिषद निवडणुकांच्या जागावाटपासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपच्या प्रमुख नेत्यांशी एकनाथ शिंदे यांची अनेकदा सविस्तर चर्चा झाली आहे. विशेष म्हणजे, एकनाथ शिंदे यांनी यासाठी दिल्ली वारी करूनही या निवडणुकीच्या जागावाटपावर अद्याप कोणताही ठोस तोडगा निघू शकलेला नाही, असेच चित्र सध्या दिसत आहे. याच राजकीय तणावातून की काय, आज जागावाटपाच्या मुद्द्यावरून विचारलेल्या प्रश्नावर एकनाथ शिंदे पत्रकारांवर चांगलेच भडकल्याचे पाहायला मिळाले. विधान परिषदेच्या जागावाटपासंदर्भात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात एक महत्त्वाची बैठक पार पडली.

या बैठकीनंतर एकनाथ शिंदे जेव्हा पत्रकारांसमोर आले, तेव्हा त्यांना पहिलाच प्रश्न या बैठकीबाबत विचारण्यात आला. हा प्रश्न ऐकताच त्यांचा संताप अनावर झाला आणि "कुठलं बोलणार... काय आहे?" असा उलट सवाल करत ते पत्रकारांवर प्रचंड संतापले. त्यांची ही बदललेली देहबोली आणि संताप पाहता राजकीय वर्तुळात उलट-सुलट चर्चांना उधाण आले असून, या बैठकीत नेमके काय घडले, याबाबत आता मोठा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला अॅडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

## सपकाळांची भाषा महाराष्ट्राच्या सुसंस्कृत परंपरेला काळिमा फासणारी - बावनकुळे



**मुंबई** : नाशिक येथे कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावरून महाविकास आघाडीकडून मोठे आंदोलन करण्यात आले. यावेळी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जहरी टीका केली आहे. या टीकेच्या निषेधार्थ आता भाजपकडून प्रत्युत्तर देण्यात येत आहे. मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ट्विट करत हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर जोरदार प्रहार केला आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, कॉंग्रेसचे कर्तुत्वशून्य प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आपल्या दिल्लीतल्या नाकर्त्या नेतृत्वाला खुश करण्यासाठी देशाचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदी जी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जी यांच्याविषयी वापरलेली घाणेरडी भाषा ही महाराष्ट्राच्या सुसंस्कृत राजकीय परंपरेला काळिमा फासणारी आहे.

पुढे बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, ही व्यक्ती एखादा सामान्य कार्यकर्ता असता तर कदाचित कोणी दखलही घेतली नसती. पण दुर्दैवाने ते आज काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष म्हणून वावरत आहेत. त्यामुळे त्यांच्या वक्तव्यातून काँग्रेसची विकृत आणि गलिच्छ राजकीय संस्कृती पुन्हा एकदा समोर आली आहे. राहुल गांधींपासून काँग्रेसच्या अनेक नेत्यांपर्यंत विरोधकांवर व्यक्तिगत पातळीवर घसरून बोलण्याची हीच परंपरा दिसते. तसेच कितनी आसानी से मशहूर किया है ख़ुद को, मैंने अपने से बड़े शख़्स को गाली दे कर..., अशा शायरीतूनही बावनकुळे यांनी टीका केली आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, ज्यांना स्वतःच्या मतदारसंघातील जनता विचारात नाही, ते देशाच्या सर्वाधिक लोकप्रिय नेतृत्वावर बोलून मथळे मिळवू पाहतात, हीच त्यांची राजकीय ऊंची आहे. महाराष्ट्राची जनता सुसंस्कृत आहे, सजग आहे आणि अशा घाणेरड्या, विकृत मानसिकतेच्या राजकारणाला कधीही स्वीकारणार नाही, याची आम्हाला पूर्ण खात्री आहे. सपकाळ यांच्या व्यक्तव्याचा मी आणि आमचा पक्ष निषेध करतो, असे बावनकुळे यांनी म्हटले आहे.

चांदवडमधील शेतकऱ्यांच्या मोर्चात भाषण कराताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, सरकार तुपाशी शेतकरी उपाशी अशी अवस्था आहे. मी तुमचा कांदा खाल्ला आहे, मी बेइमानी करणार नाही. नालायक म्हणायचे ह***र म्हणायचे, कांदाखोर म्हणायचे, असे हे नालायक सरकार आहे. फडणवीस तर गद्दार माणूस आहे. 24 रुपयांनी कांदा खरेदीचे आश्वासन दिलेले होते. फडणवीस म्हणाले होते वेगळा विदर्भ झाल्याशिवाय लग्न करणार नाही आणि लग्न केले. त्यामुळे ते महाराष्ट्राचे खोटारडे मुख्यमंत्री आहेत.

पुढे बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, मोदी यांनी आजू-बाजूच्या देशांसोबत भंडण घेतले आहे. जो पर्यंत **** खुर्चीवर आहे तो पर्यंत कांदा आयात होणार नाही. बांगलादेश श्रीलंका आपला कांदा घेणार नाही. नरेंद्र हा **** आहे. एपस्टीन फाईलमध्ये मोदींनी काय काय केले ज्यामुळे ते ट्रम्प यांचे ऐकत आहेत? मोदींमुळे आपले चांगले होऊ शकत नाही. कांदा खरेदी आता एपीएमसी मधेच झाली पाहिजे. झोपेच सोंग करणारे खोट सरकार आहे. मोदींना बैलगाडीत बसून त्याची हिमालयात विल्हेवाट लावा, अशी वादग्रस्त टीका सपकाळ यांनी केली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २७ मे २०२६


# चंद्रपूर-गडचिरोलीतील २३ नगरसेवक नॉट रिचेबल



**नागपूर :** महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पूर्व विदर्भातील राजकारण चांगलेच तापले असून, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी थेट घोडेबाजाराचा गंभीर आरोप करत मोठा राजकीय गौप्यस्फोट केला आहे. चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातील काँग्रेसचे तब्बल २३ नगरसेवक सध्या संपर्काबाहेर असून, पैशांच्या जोरावर त्यांना फोडण्यात आल्याचा खळबळजनक दावा वडेट्टीवार यांनी या वेळी केला आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले, आमचे चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्याचे जवळपास २३ नगरसेवक नॉट रिचेबल आहेत आणि मी १०० टक्के सांगतो की, पाच-पाच लाख रुपये देऊन त्यांना उचलले आहे. आमची ती सगळी लोक पैशाने विकली गेलेली आहेत. आता व्हीप जारी करून त्यांच्या घराला व्हीप चिपकवणार आहोत आणि त्या नगरसेवकांना अपात्र करण्याचीह कारवाई आम्ही सुरू करू, असे वडेट्टीवार म्हणाले.

काँग्रेसच्या नगरसेवकाचा भाजप आमदार बंटी भांगडिया यांच्यासोबतचा एक फोटो समोर आला आहे. यावर विजय वडेट्टीवार म्हणाले, फोटो जुना आहे की आताचा हे मी सांगू शकत नाही. परंतु, एक नक्की आहे की, चंद्रपूरमध्ये घोडा बाजार प्रचंड तेजीत आहे आणि त्यांनी तो घोडेबाजार सुरू केलेला आहे. या घोडा बाजाराची गरजही नव्हती. पण आमदार ठेकेदार झाल्यानंतर पैशांची गरमी आणि मस्ती येतेच, ती मस्ती त्यामध्ये दिसत आहे.

पुढे बोलताना विजय वडेट्टीवार म्हणाले, बिना श्रमाने लोकप्रतिनिधी म्हणून आता आमदाराचे ठेकेदार व्हायला लागले, तर काय नीतीमत्ता, नैतिकता काय राहिली? राजकारणात सत्ता आणि पावर हे दोन्ही एकत्र घेऊन काम होत राहिले तर सामान्य जनतेचे हाल होणारच आहे, असे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

बंटी भांगडिया यांनी, तुमचे नगरसेवक तुम्ही सांभाळू शकला नाही, त्यात आमचे नाव का घेताय? असा सवाल केला होता. यावर प्रत्युत्तर देताना विजय वडेट्टीवार म्हणाले, जर राज्यात सत्ता नसती तर कुत्रही मागे गेले नसते, सत्ता जाऊ दे आणि ने म्हणा उचलत, कोणात किती दम आहे तर. सत्तेचा उपयोग काही लोकांना धाक देण्यासाठी करायचा, बँकेच्या संचालकांना धाक द्यायचा, यामुळे काही लोकांना घाबरवले. तर एका ठिकाणी सरपंचाचा मुलगा आहे, त्याला तुरुंगात टाकण्याचे धमकी दिली. अशा धमक्या देऊन राजकारण सुरू असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला आहे.

मी पुन्हा जबाबदारीने सांगतो, पाच-पाच लाख रुपये त्यांना देण्यात आले आहेत आणि माझ्याकडे तसे पुरावे आहेत. माझ्याकडे माझ्या लोकांचे सगळे रेकॉर्ड आहेत, किती-किती पैसे घेतले, जे झाले ते क्लिअर आहे, आता ॲडव्हान्स दिला आहे. पुन्हा काही देतील. कोणी म्हणाले १० लाख देऊ, कोणी म्हणतो १५ लाख देऊ, कोणी म्हणतो काँग्रेस जेवढे डेल त्याच्या डबल देऊ अशी चर्चा आहे, असा गंभीर आरोप विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

नागपूर विधान परिषद निवडणूक बिनविरोध करण्याच्या भाजपच्या तयारीबाबत सुरू असलेल्या चर्चेवर विजय वडेट्टीवार यांनी आपली स्पष्ट भूमिका मांडली आहे. ते म्हणाले, जर ही निवडणूक बिनविरोध करायची असेल, तर भाजपने केवळ एकाच जागेवर नव्हे, तर सर्वच्या सर्व जागांवर चर्चा करावी, असे त्यांनी सुनावले आहे. तसेच, आगामी विधान परिषद निवडणुकीसाठी वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली या तीनही जिल्ह्यांतून काँग्रेसकडे उमेदवारांची नावे आली असून, पुढील एक-दोन दिवसांतच महाविकास आघाडीचा अधिकृत उमेदवार निश्चित केला जाईल, असेही वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले आहे.

# प्रेमाचे नाटक करून तब्बल १४० तरुणींना गंडा!

**डोंबीवली :** सोशल मीडियाच्या माध्यमातून तरुणींसोबत ओळख वाढवायची, त्यानंतर प्रेमाचे नाटक करायचे, त्यांचा विश्वास संपादन केल्यानंतर या तरुणींच्या नावावर लाखो रुपयांचे कर्ज काढायचे आणि फरार व्हायचे. हा प्रकार डोंबिवली येथे घडला आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून तब्बल १४० पेक्षा जास्त तरुणींना जाळ्यात ओढणाऱ्या आदर्श म्हात्रे या भामट्याला पोलिसांनी अखेर अटक केली आहे.

डोंबिवलीतील मानपाडा पोलिसांनी केलेल्या एका कारवाईतून सोशल मीडियावरील फसवणुकीचा एक अत्यंत गंभीर प्रकार समोर आला आहे. पनवेल परिसरातील रहिवासी असलेला आदर्श म्हात्रे हा आरोपी सोशल मीडियावरून तरुणींशी मैत्री करून त्यांच्याशी जाणीवपूर्वक प्रेमसंबंध प्रस्थापित करत असे. त्यानंतर लग्नाचे आमिष व भविष्याची सुंदर स्वप्ने दाखवून तो या तरुणींचा पूर्ण विश्वास संपादन करायचा आणि याच विश्वासाचा गैरफायदा घेत त्यांच्या नावावर विविध बँकांमधून लाखो रुपयांचे कर्ज काढून तो पसार होत असल्याचे पोलिसांच्या तपासात उघडकीस आले आहे.

पोलिसांच्या तपासात एक अत्यंत धक्कादायक बाब उघडकीस आली असून, या आरोपीने आतापर्यंत तब्बल १४० हून अधिक तरुणींना आपल्या जाळ्यात ओढून त्यांची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे. यात विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे, या फसवणुकीला बळी पडलेल्या बहुतांश महिला या उच्चशिक्षित असून त्या कॉर्पोरेट, बँकिंग, आर्थिक तसेच व्यावसायिक क्षेत्रात मोठ्या आणि जबाबदारीच्या पदांवर कार्यरत असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

या फसवणुकीच्या प्रकाराला कंटाळून आतापर्यंत ११ महिला आणि तरुणींनी धैर्याने पुढे येत पोलिसांकडे आपल्या अधिकृत तक्रारी दाखल केल्या आहेत. मात्र, बदनामीच्या भीतीपोटी अजूनही अनेक पीडित महिला तक्रार करण्यास टाळाटाळ करत असण्याची दाट शक्यता पोलिसांकडून वर्तवली जात आहे.

यापूर्वीही अशाच प्रकारच्या फसवणुकीच्या गुन्ह्यात नवी मुंबई पोलिसांनी आरोपी आदर्श म्हात्रे याला अटक केली होती. त्याच्या अटकेच्या बातम्या माध्यमांमध्ये प्रसारित झाल्यानंतर, डोंबिवलीतील एका पीडित तरुणीने धाडस एकवटून मानपाडा पोलिस ठाण्यात त्याच्याविरोधात रीतसर तक्रार दाखल केली. या तक्रारीची गंभीर दखल घेत पोलिसांनी तातडीने कारवाईची चक्रे फिरवली आणि आरोपीला बेड्या ठोकल्या.

या संपूर्ण घटनेच्या पार्श्वभूमीवर, सोशल मीडियाच्या माध्यमातून होणारी अनोळखी ओळख, त्यातून जुळणारे प्रेमसंबंध आणि पैशांचे व्यवहार यांबाबत अत्यंत सावधगिरी बाळगण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. तसेच, या सराईत आरोपीने अशाच प्रकारे आणखी किती महिलांना आपल्या जाळ्यात अडकवून त्यांची आर्थिक फसवणूक केली आहे, याचा सखोल तपास सध्या पोलिसांकडून सुरू आहे.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २७ मे २०२६

## प्रिय आमची शाळा

प्रिय आमची शाळा
वाटते खूप छान
ज्ञानामृत पिऊनी
गातो आम्ही गुणगान

इतिहास डोकावून पाहता
शूरविरांचे होते स्मरण
मातृभूमीच्या रक्षणासाठी
स्विकारले त्यांनी मरण

ग्रह ताऱ्यांचा अभ्यास
शिकविते भूगोल
कथा कवितेतून उमलते
शब्दांचे मोल

माणवि उत्क्रांती करीता
झेप घेतली विज्ञानाने
नवतंत्राचा संदेश देत
काम सुलभ केले संगणकाने


गुरूजनांचे मार्गदर्शन होता
शिस्तीने फुलते तनमन
प्रिय वाटते आमची शाळा
इथेच घडते जीवन



- रवींद्र चालोकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

# स्वा. सावरकर जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी विजय शिनकर







**कन्नड (अरुण थोरात) :** भारत मातेचे सुपुत्र, थोर स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती दि. 28 मे रोजी त्यांच्या कार्याला उजाळा देण्यासाठी व त्यांचे कार्य सर्वश्रुत होण्यासाठी विविध उपक्रमांनी साजरी करण्याचे ठरले आहे. यात सकाळी 9:00 वाजता प्रतिमा पूजन व विनम्र अभिवादन या नंतर स्वा. सावरकर अभ्यासक, परखड वक्ते, ह.भ.प. गौरव महाराज खरे यांचे 'सावरकरांच्या दृष्टिने हिंदुत्व" या विषयावर व्याख्यान होणार आहे. तसेच दत्ताजी भाले रक्त केंद्र छत्रपती संभाजीनगर यांच्या सहकार्याने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. स्वा. सावरकरांच्या प्रेरक जीवनपटावर होणाऱ्या या व्याखानासाठी व रक्तदान सर्व श्रेष्ठ दान आहे. या उक्तीप्रमाणे सर्व स्वा. सावरकर प्रेमी व रक्तदात्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन स्वा. सावरकर जयंती उत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष शशिन जाधव, अध्यक्ष विजय शिनकर, उपाध्यक्ष प्रविण अहिरे, सचिव संजय जोशी, सहसचिव अरविंद राठोड, कोषाध्यक्ष शुभम वायडे, सदस्य अभिजीत शेळके, ऋषीराज वैष्णव यांनी केले आहे.

# वेरूळला अर्धा तास गारपीट अन् पाऊस



**लाडसावंगी :** शहरासह तालुक्यात विजांच्या कडकडाटासह जोरदार वादळी वाऱ्याने हजेरी लावली. त्यानंतर सुरू झालेल्या मुसळधार पावसाने संपूर्ण परिसराला अक्षरशः झोडपून काढले. असून नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला. शहरात काही ठिकाणी झाडांच्या फांद्या तुटून पडल्याच्या घटना घडल्या. या पावसामुळे बाजारपेठेत धावपळ उडाली होती.

वीटभट्टी चालकांनी मोठ्या प्रमाणावर कच्च्या विटा तयार करून त्या भाजणीसाठी व विक्रीसाठी रचून ठेवल्या होत्या. त्यांचे या पावसानेआर्थिक नुकसान झाले आहे.

करमाड परिसरात सोमवारी दुपारपर्यंत कडक उन्हामुळे नागरिक उष्णतेने हैराण झाले होते. तापमानात मोठी वाढ झाल्याने बाजारपेठेसह सार्वजनिक ठिकाणी शुकशुकाट जाणवत होता. मात्र दुपारी तीन वाजेच्या सुमारास अचानक वातावरणात बदल झाला आणि मान्सूनपूर्व पावसाने झोडपले. काळे ढग दाटून येत वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाला सुरुवात झाली. तब्बल पाऊण तास सुरू असलेल्या पावसामुळे करमाड शहरातील अनेक भागांत पाणी साचले. दुपारी सव्वातीन वाजेच्या सुमारास आकाशातून गावरान बोराएवढ्या गारांचाही वर्षाव झाला. परिणामी, बाजारात तारांबळ उडाली होती.

वेरूळ व परिसरात आज दुपारी अचानक वातावरणात बदल होऊन अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. दुपारी 3 वाजण्याच्या सुमारास अचानक आलेल्या काळ्या ढगांसह विजांच्या कडकडाटाला सुरुवात झाली आणि पाठोपाठ सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. काही भागात गारपीटही झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. सुमारे अर्धा तास झालेल्या या पावसामुळे संपूर्ण वेरूळ परिसर जलमय झाला. अचानक आलेल्या पावसामुळे वेरूळ लेणी पाहण्यासाठी आलेल्या पर्यटकांची चांगलीच तारांबळ उडाली. अनेक पर्यटकांनी लेणीच्या व्हरांड्यात व सुरक्षित ठिकाणी आसरा घेतला. गारपिटीमुळे लेणी परिसरातील वृक्षांच्या फांद्या तुटून पडल्या.

लाडसावंगी । परिसरात आज रात्री अचानक हवामान बदलले. रात्री 8:25 वाजता विजांच्या कडकडाटासह वादळी वाऱ्यात जोरदार पाऊस सुरू झाला. पावसाचा पहिला थेंब पडताच गावचा वीजपुरवठा खंडित झाला. संपूर्ण लाडसावंगी परिसरात अंधार पसरला. गेल्या काही दिवसांपासून नागरिक उकाड्याने हैराण होते. सव्वाआठच्या सुमारास ढगांच्या गडगडाटासह पावसाला सुरुवात झाली. उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला. पाऊस सुरू होताच काही सेकंदांत वीज गायब झाली. नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. रात्री वीज गेल्याने नागरिकांची तारांबळ उडाली. महावितरणच्या ढिसाळ नियोजनामुळे दरवर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीलाच अशी स्थिती होते. खुलताबाद, छत्रपती संभाजीनगर तालुक्यात विजेच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस कोसळला. त्यातच सोसाट्याचा वारा आणि गाराही पडल्या. त्यामुळे शेतकऱ्यांची धावपळ झाली. वीजभट्टी चालकांचे मोठे नुकसान झाले. करमाड्च्या आठवडी बाजारात पाणी तुंबून ग्राहक, दुकानदारांची धावपळ उडाली. काही गावांमध्ये झाडेही पडली. पत्रे उडाली. पावसाचा जोर कायम राहिल्याने रस्त्यांवर पाणी साचले, तर अनेक ठिकाणी नागरिकांची तारांबळ उडाल्याचे चित्र पाहायला मिळाले. गेल्या काही दिवसांपासून असह्य उकाडा आणि वाढत्या तापमानामुळे नागरिक हैराण झाले होते. वेरूळला अर्धा तास गारीपीट आणि पाऊस झाला.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २७ मे २०२६

# रमाबाई आंबेडकर : संघर्षातील शांत शक्ती



**भा**रतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्याचा विचार करताना त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक टप्प्यावर खंबीरपणे उभ्या राहिलेल्या रमाबाई आंबेडकर यांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत आदराने आणि कृतज्ञतेने स्मरणात येते. भारतीय समाजव्यवस्थेतील अन्याय, अस्पृश्यता, गरिबी, सामाजिक बहिष्कार आणि मानवी अपमानाच्या काळोखात बाबासाहेबांनी उभी केलेली परिवर्तनाची मशाल तेजाने प्रज्वलित राहिली, त्यामागे रमाबाईंचे त्यागमय जीवन आणि शांत पण समर्थ सहकार्य मोठ्या प्रमाणात कार्यरत होते. बाबासाहेबांच्या आयुष्याचा इतिहास जितका संघर्षाचा आहे, तितकाच तो रमाईंच्या त्यागाचा आणि सहनशीलतेचाही आहे. म्हणूनच २७ मे रोजी येणारा रमाबाई आंबेडकर स्मृतिदिन हा केवळ एका व्यक्तीच्या स्मृतीचा दिवस नसून त्याग, समर्पण, सहनशीलता आणि स्त्रीशक्तीच्या अद्वितीय योगदानाचे स्मरण करणारा दिवस आहे.रमाबाई आंबेडकर यांचा जन्म ७ फेब्रुवारी १८९८ रोजी कोकणातील दापोली तालुक्यातील वणंद या गावात झाला. त्यांचे वडील भिकू धुतरे हे अत्यंत गरीब कुटुंबातील मेहनती व्यक्ती होते. लहान वयातच रमाबाईंच्या आयुष्यात दुःखाचे सावट आले. आई-वडिलांचे निधन झाल्यानंतर त्यांचे बालपण अत्यंत हालअपेष्टांत गेले. आर्थिक अडचणी, उपासमार, असुरक्षितता आणि सामाजिक दुर्लक्ष अशा परिस्थितीत त्यांचे बालजीवन घडले. त्या काळात मुलींना शिक्षणाची संधी नव्हतीच; त्यात दलित समाजातील मुलींची अवस्था अधिकच बिकट होती. त्यामुळे रमाबाई औपचारिक शिक्षणापासून वंचित राहिल्या. परंतु जीवनाच्या कठोर अनुभवांनी त्यांना प्रगल्भ बनवले.१९०६ मध्ये अवघ्या नऊ वर्षांच्या रमाबाईंचा विवाह पंधरा वर्षीय भीमराव आंबेडकर यांच्याशी झाला. हा विवाह जरी पारंपरिक पद्धतीने झाला असला तरी पुढे या नात्याने भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान मिळवले. विवाहानंतर रमाबाईंच्या आयुष्यात संघर्ष अधिकच वाढला. बाबासाहेब उच्च शिक्षणासाठी झटत होते. त्यांना शिक्षणाची प्रचंड ओढ होती आणि त्यासाठी आर्थिक संकटांशी सतत लढावे लागत होते. अशा वेळी रमाबाई यांनी संसाराचा संपूर्ण भार स्वतःच्या खांद्यावर घेतला. अत्यंत गरिबीत संसार चालवताना त्यांनी कधीही तक्रार केली नाही. बाबासाहेबांच्या शिक्षणात कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी त्यांनी स्वतःच्या इच्छा-आकांक्षांचा पूर्णतः त्याग केला.त्या काळातील परिस्थिती अत्यंत कठीण होती. घरात अनेकदा अन्नधान्य नसे, मुलांचे संगोपन करणे कठीण जाई, आजारपण आणि आर्थिक विवंचना कायम असत. बाबासाहेब विदेशात शिक्षण घेत असताना रमाबाई मुंबईत अत्यंत हालअपेष्टा सहन करत होत्या. संसार चालवण्यासाठी त्यांनी अनेक संकटांचा सामना केला. काही वेळा उपाशीपोटी दिवस काढावे लागत, तरीही त्यांनी बाबासाहेबांना कधीही शिक्षण सोडून परत येण्यास सांगितले नाही. त्यांच्या मनात बाबासाहेबांच्या ध्येयाबद्दल प्रचंड विश्वास होता. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाचे उद्धारकार्य बाबासाहेब करणार आहेत, याची त्यांना जाणीव होती. त्यामुळे त्यांनी स्वतःच्या वेदना मनात ठेवून बाबासाहेबांना सतत प्रेरणा दिली.रमाबाईंचे व्यक्तिमत्त्व अत्यंत साधे, शांत आणि संयमी होते. त्यांना कोणत्याही प्रकारचा दिखाऊपणा आवडत नसे. साधी राहणी, परिश्रमशील वृत्ती आणि कुटुंबाविषयी अपार प्रेम हे त्यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य होते. त्या धार्मिक वृत्तीच्या होत्या. संकटांच्या काळात त्या देवभक्तीतून मानसिक बळ मिळवत असत. बाबासाहेब मात्र तर्कवादी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले होते. तरीही या दोघांमध्ये परस्पर आदर आणि समजूतदारपणा कायम राहिला. बाबासाहेबांनी अनेकदा रमाबाईंच्या सहनशीलतेचा आणि त्यागाचा उल्लेख अत्यंत आदराने केला आहे.रमाबाईंच्या आयुष्यातील सर्वांत वेदनादायक बाब म्हणजे त्यांच्या मुलांचे निधन. त्यांना एकूण पाच अपत्ये झाली; परंतु त्यापैकी बहुतेक मुलांचे लहान वयातच निधन झाले. दारिद्र्य, आरोग्याच्या समस्या आणि अपुऱ्या वैद्यकीय सुविधांमुळे त्यांना आपल्या लेकरांना गमवावे लागले. या दुःखाने रमाबाई आतून खचून गेल्या होत्या. मातृत्वाच्या असंख्य वेदना त्यांनी सहन केल्या. तरीही त्यांनी बाबासाहेबांच्या कार्यात कधी अडथळा आणला नाही. उलट त्यांच्या मानसिक स्थैर्याला आधार देण्याचा प्रयत्न केला. एका आईच्या आणि पत्नीच्या भूमिकेत त्यांनी केलेला त्याग अनमोल आहे.बाबासाहेबांचे जीवन म्हणजे सततचा संघर्ष होता. अस्पृश्यतेविरुद्धचा लढा, शिक्षणासाठीचा संघर्ष, सामाजिक न्यायासाठीचे आंदोलन, कायद्याचा अभ्यास, राजकीय जबाबदाऱ्या आणि समाजजागृती या सर्व क्षेत्रांत बाबासाहेब कार्यरत होते. या प्रत्येक टप्प्यावर रमाबाई त्यांच्यासोबत सावलीसारख्या उभ्या राहिल्या. त्यांनी स्वतःला कधीही पुढे आणले नाही; परंतु बाबासाहेबांच्या यशामागे त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे होते. समाजपरिवर्तनासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तीच्या पाठीशी उभे राहण्यासाठी जी मानसिक ताकद लागते, ती रमाबाईंकडे होती.महाड सत्याग्रह, चवदार तळ्याचा लढा, मंदिरप्रवेश आंदोलन, गोलमेज परिषद यांसारख्या ऐतिहासिक घटनांच्या काळात बाबासाहेबांचे जीवन अत्यंत व्यस्त आणि संघर्षमय होते. या काळात रमाबाई घराची जबाबदारी सांभाळत होत्या. आर्थिक ताण, सामाजिक दबाव आणि वैयक्तिक दुःख यांचा सामना करत त्यांनी बाबासाहेबांना मानसिक आधार दिला. एका अर्थाने बाबासाहेबांच्या सामाजिक क्रांतीला आवश्यक असलेली भावनिक शक्ती रमाबाईंकडूनच मिळत होती.रमाबाईंच्या व्यक्तिमत्त्वात असलेली सहनशीलता आजच्या समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी कधीही स्वतःच्या दुःखाचे प्रदर्शन केले नाही. गरिबी, उपासमार, आजारपण, मुलांचे मृत्यू आणि सामाजिक अपमान या सर्व संकटांना त्यांनी धैर्याने तोंड दिले. त्यांच्या आयुष्याचा विचार केला तर लक्षात येते की त्या केवळ एका महान व्यक्तीच्या पत्नी नव्हत्या, तर स्वतःमध्येही एक महान व्यक्तिमत्त्व होत्या. त्यांचे योगदान शब्दांत मांडणे कठीण आहे.रमाबाईंच्या आयुष्यातील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे त्यांची संवेदनशीलता. घरात कोणीही उपाशी राहू नये, गरजू व्यक्तींना मदत करावी, संकटात असलेल्या लोकांना धीर द्यावा, अशी त्यांची वृत्ती होती. अत्यंत गरिबीत राहूनही त्यांनी माणुसकी जपली. त्यांचे जीवन हे करुणा आणि सहअस्तित्वाचे उदाहरण होते. त्या काळातील दलित स्त्रियांच्या जीवनातील दुःख आणि संघर्ष रमाबाईंच्या जीवनातून स्पष्टपणे दिसून येतात.स्त्रीशक्तीचा विचार करताना अनेकदा समाज केवळ प्रसिद्ध आणि सार्वजनिक जीवनात कार्य करणाऱ्या महिलांकडे पाहतो; परंतु घराच्या चार भिंतीत राहून समाजपरिवर्तनाच्या महान कार्याला आधार देणाऱ्या स्त्रियांचे योगदानही तितकेच महत्त्वाचे असते. रमाबाई यांचे जीवन हे अशा स्त्रीशक्तीचे सर्वोच्च उदाहरण आहे. त्यांनी कुटुंब, संसार आणि सामाजिक जबाबदाऱ्या सांभाळताना दाखवलेली संयमशीलता आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे.बाबासाहेबांनी अनेकदा आपल्या लेखनात आणि भाषणांत रमाबाईंच्या त्यागाचा उल्लेख केला आहे. त्यांनी रमाबाईंना अत्यंत प्रेमाने "रमा" किंवा "रामू" असे संबोधले. बाबासाहेबांच्या आयुष्यात रमाबाईंचे स्थान किती महत्त्वाचे होते, हे त्यांच्या अनेक आठवणींमधून दिसून येते. बाबासाहेबांनी शिक्षणासाठी केलेल्या संघर्षात रमाबाईंचे सहकार्य नसते, तर कदाचित इतिहासाची दिशा वेगळी असती. कारण संघर्षाच्या काळात मानसिक आधार देणारी व्यक्तीच एखाद्याला मोठ्या ध्येयासाठी लढण्याची शक्ती देते.रमाबाईंचे आरोग्य पुढे खालावत गेले. सततची गरिबी, कष्ट, अपुरी आहारव्यवस्था आणि मानसिक ताण यामुळे त्यांची प्रकृती ढासळली. बाबासाहेब त्या काळात अत्यंत व्यस्त होते. समाजकारण, राजकारण आणि कायदेविषयक कामांमध्ये त्यांचा वेळ जात होता. तरीही रमाबाईंच्या प्रकृतीबद्दल त्यांना सतत चिंता वाटत असे. अखेर २७ मे १९३५ रोजी रमाबाईंचे निधन झाले. त्यांच्या मृत्यूने बाबासाहेब अत्यंत दुःखी झाले. त्यांनी आपल्या आयुष्यातील एक मोठा आधार गमावला होता.रमाबाईंच्या निधनानंतर बाबासाहेब काही काळ अत्यंत खचून गेले होते. त्यांनी आपल्या आयुष्यातील संघर्षमय प्रवासात ज्यांच्यावर सर्वाधिक विश्वास ठेवला, ती व्यक्ती त्यांच्यापासून दूर गेली होती. बाबासाहेबांनी रमाबाईंच्या स्मरणार्थ अनेकदा भावनिक शब्दांत आपली कृतज्ञता व्यक्त केली. त्यांच्या जीवनातील त्यागाचे मोल त्यांनी मनापासून मान्य केले.आजच्या काळात रमाबाई आंबेडकर यांचे जीवन नव्या पिढीसाठी प्रेरणेचा स्रोत आहे. त्यांचे जीवन आपल्याला सांगते की मोठ्या परिवर्तनामागे अनेक अनामिक त्याग असतात. समाजाला दिशा देणाऱ्या व्यक्तींच्या यशामागे त्यांच्या कुटुंबीयांचे, विशेषतः स्त्रियांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असते. रमाबाईंचे जीवन हे स्त्रीशक्तीच्या संयमी आणि समर्पित रूपाचे प्रतीक आहे.समाजात आजही अनेक महिला विविध संकटांचा सामना करत आहेत. आर्थिक अडचणी, कौटुंबिक जबाबदाऱ्या, सामाजिक दबाव आणि असमानता या समस्यांमध्येही त्या कुटुंब आणि समाजासाठी झटत आहेत. अशा वेळी रमाबाईंचे जीवन त्यांना संघर्षातून उभे राहण्याची प्रेरणा देते. त्यांचा त्याग हा केवळ वैयक्तिक नव्हता; तो सामाजिक परिवर्तनासाठी दिलेला मूक वाटा होता.रमाबाईंच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांचे कार्य आणि योगदान समाजासमोर मांडणे आवश्यक आहे. अनेकदा इतिहासात मोठ्या व्यक्तींची नावे प्रसिद्ध होतात; परंतु त्यांच्या संघर्षात सहभागी असलेल्या व्यक्ती दुर्लक्षित राहतात. रमाबाईंचे जीवन हे अशाच दुर्लक्षित पण अत्यंत महत्त्वाच्या योगदानाचे उदाहरण आहे. त्यांच्या स्मृती जतन करणे म्हणजे समाजातील त्याग, सहनशीलता आणि माणुसकीच्या मूल्यांना जपणे होय.भारतीय स्त्रीच्या संघर्षमय जीवनाचे एक प्रभावी चित्र रमाबाईंच्या आयुष्यातून दिसते. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही धैर्य गमावले नाही. कुटुंबासाठी, पतीच्या ध्येयासाठी आणि मुलांसाठी त्यांनी आयुष्यभर कष्ट केले. त्यांच्या जीवनात सुखाचे क्षण फार कमी होते; परंतु त्यांनी दुःखाला शरण न जाता त्यातून जगण्याची ताकद निर्माण केली.रमाबाईंच्या जीवनाचा अभ्यास करताना त्या काळातील सामाजिक परिस्थितीही समजून घ्यावी लागते. दलित समाजावर होणारा अन्याय, अस्पृश्यतेमुळे मिळणारी अमानुष वागणूक, शिक्षणाचा अभाव, गरिबी आणि सामाजिक बहिष्कार या सगळ्या परिस्थितीत रमाबाई जगत होत्या. अशा काळात त्यांनी बाबासाहेबांना केवळ साथच दिली नाही, तर त्यांच्या ध्येयासाठी स्वतःचे जीवन वाहून घेतले.आज अनेक सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांद्वारे रमाबाई आंबेडकर यांच्या स्मृती जपल्या जात आहेत. त्यांच्या नावाने महिला वसतिगृहे, शैक्षणिक संस्था, सामाजिक उपक्रम आणि स्मारके उभारण्यात आली आहेत. हे केवळ स्मरणाचे प्रतीक नाही, तर स्त्रीशक्तीचा सन्मान करण्याचा प्रयत्न आहे. रमाबाईंच्या जीवनातून प्रेरणा घेऊन महिलांनी शिक्षण, स्वाभिमान आणि सामाजिक जाणीव यांचा स्वीकार करणे आवश्यक आहे.रमाबाईंचे जीवन हे त्यागाच्या माध्यमातून इतिहास घडवणाऱ्या स्त्रीचे उदाहरण आहे. त्यांनी स्वतःचे आयुष्य प्रसिद्धीसाठी जगले नाही. त्यांना कोणत्याही पदाची किंवा सत्तेची अपेक्षा नव्हती. त्यांचे ध्येय केवळ कुटुंब आणि बाबासाहेबांच्या स्वप्नांना आधार देणे हेच होते. म्हणूनच त्यांचे योगदान अधिक मोठे वाटते. आजच्या भौतिकवादी युगात त्यांचे साधेपण आणि समर्पण समाजाला माणुसकीची जाणीव करून देते.रमाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांची मानसिक ताकद. संकटांच्या काळात अनेकजण खचून जातात; परंतु रमाबाई संकटांतही शांत राहिल्या. त्यांनी दुःख सहन केले, पण धैर्य सोडले नाही. त्यांच्या या वृत्तीमुळे बाबासाहेबांना समाजकार्यासाठी आवश्यक स्थैर्य मिळाले. त्यांचे जीवन हे मानसिक सामर्थ्याचे जिवंत उदाहरण आहे.स्त्री-पुरुष समानतेच्या विचारांचा पाया मजबूत करण्यासाठी रमाबाईंचे जीवन अभ्यासणे आवश्यक आहे. स्त्रीचे योगदान केवळ घरापुरते मर्यादित नसते; ती समाजपरिवर्तनाची महत्त्वाची भागीदार असते. रमाबाई यांनी हे आपल्या आयुष्यातून सिद्ध केले. त्यांचे योगदान सामाजिक इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले जावे, इतके मोठे आहे.रमाबाईंच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांचे विचार आणि जीवनमूल्ये नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज आहे. त्याग, संयम, माणुसकी, सहकार्य आणि ध्येयनिष्ठा या मूल्यांची आज समाजाला अत्यंत आवश्यकता आहे. वाढती स्पर्धा, स्वार्थी वृत्ती आणि नातेसंबंधांमधील ताण यांच्या काळात रमाबाईंचे जीवन आपल्याला संवेदनशीलतेचा आणि नात्यांमधील विश्वासाचा संदेश देते.रमाबाई आंबेडकर या नावात केवळ एका स्त्रीची ओळख नाही, तर संघर्षातून उभ्या राहिलेल्या भारतीय स्त्रीचे सामर्थ्य दडलेले आहे. त्यांनी संकटांना घाबरून न जाता त्यांच्याशी सामना केला. त्यांनी दुःखाला स्वीकारले, पण आशा सोडली नाही. त्यांच्या जीवनाचा विचार करताना मनात आदर आणि कृतज्ञतेची भावना निर्माण होते.समाजातील प्रत्येक व्यक्तीने रमाबाईंच्या जीवनातून प्रेरणा घ्यावी. कष्ट, त्याग आणि समर्पण यांच्यामुळेच मोठे परिवर्तन घडते, हा संदेश त्यांच्या आयुष्यातून मिळतो. आज महिलांच्या सक्षमीकरणाबद्दल मोठ्या प्रमाणात चर्चा होत असली तरी त्यासाठी आवश्यक असलेली मूल्ये रमाबाईंच्या जीवनात स्पष्टपणे दिसतात. आत्मविश्वास, सहनशीलता आणि कुटुंबाविषयीची जबाबदारी यांचा सुंदर समन्वय त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होता.रमाबाईंच्या स्मृतिदिनाचे महत्त्व केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरते मर्यादित राहता कामा नये. त्यांच्या जीवनाचा अभ्यास शाळा, महाविद्यालये आणि समाजसंस्थांमध्ये व्हायला हवा. त्यांच्या त्यागमय जीवनाची माहिती नव्या पिढीपर्यंत पोहोचल्यास समाजात संवेदनशीलता आणि सामाजिक जाणीव वाढेल. बाबासाहेबांच्या कार्याची मुळे समजून घ्यायची असतील, तर रमाबाईंच्या त्यागाचे महत्त्व समजून घ्यावे लागेल.आजच्या आधुनिक समाजात कुटुंबव्यवस्थेवर अनेक प्रकारची आव्हाने आहेत. अशा काळात रमाबाईंचे जीवन कुटुंबातील परस्पर सहकार्य, विश्वास आणि त्याग यांचे महत्त्व अधोरेखित करते. त्यांनी बाबासाहेबांच्या ध्येयाला स्वतःचे ध्येय मानले. त्यांच्या संघर्षाला स्वतःचा संघर्ष समजले. म्हणूनच त्यांचे वैवाहिक जीवन केवळ संसार नव्हते, तर एका सामाजिक ध्येयासाठीची संयुक्त साधना होती.रमाबाईंच्या आयुष्याकडे पाहताना आपल्याला स्त्रीच्या अदृश्य श्रमांचे महत्त्व समजते. घर सांभाळणे, मुलांची काळजी घेणे, संकटांना तोंड देणे आणि कुटुंबातील सदस्यांना मानसिक आधार देणे ही कामे समाज अनेकदा गृहीत धरतो. परंतु या कामांमुळेच मोठी स्वप्ने पूर्ण होतात. बाबासाहेबांच्या महान कार्यामागे रमाबाईंची हीच अदृश्य शक्ती कार्यरत होती.रमाबाई आंबेडकर यांचे जीवन हे भारतीय समाजातील वंचित स्त्रीच्या संघर्षाचे प्रतीक आहे. त्यांनी प्रतिकूलतेतही स्वाभिमानाने जगण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या आयुष्यातील दुःख आणि त्याग समजून घेतल्याशिवाय बाबासाहेबांच्या संघर्षाचे पूर्ण चित्र समोर येत नाही. म्हणूनच रमाबाईंच्या स्मृतींचा सन्मान करणे म्हणजे सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासातील एका महत्त्वपूर्ण अध्यायाला आदर देणे होय.रमाबाईंचे जीवन आपल्याला शिकवते की मोठेपणा हा केवळ प्रसिद्धीत नसतो, तर निःस्वार्थी कार्यात असतो. त्यांनी स्वतःसाठी काही मागितले नाही. त्यांचे संपूर्ण आयुष्य इतरांसाठी जगण्यात गेले. म्हणूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक महान वाटते. त्यांची साधी राहणी आणि उच्च विचारसरणी समाजासाठी प्रेरणादायी आहे.आज महिलांना शिक्षण, रोजगार आणि सामाजिक सहभागाच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. तरीही अनेक महिलांना संघर्ष करावा लागतो. अशा वेळी रमाबाईंचे जीवन त्यांना मानसिक बळ देते. संकटांना सामोरे जाताना धैर्य आणि संयम कसे राखावे, हे त्यांच्या आयुष्यातून शिकण्यासारखे आहे.रमाबाईंच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांचे स्मरण करताना केवळ श्रद्धांजली वाहून थांबणे पुरेसे नाही. त्यांच्या मूल्यांचा स्वीकार करणे आवश्यक आहे. समाजात समानता, माणुसकी आणि सहकार्याची भावना वाढवण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करायला हवेत. बाबासाहेबांनी ज्या समतामूलक समाजाचे स्वप्न पाहिले, त्या स्वप्नाच्या उभारणीत रमाबाईंचा मूक पण महत्त्वपूर्ण वाटा होता.भारतीय इतिहासातील अनेक स्त्रिया आपल्या त्यागामुळे आणि समर्पणामुळे स्मरणात राहिल्या आहेत. रमाबाई आंबेडकर यांचे नाव त्यामध्ये अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांनी आयुष्यभर संकटांचा सामना केला, पण कधीही कर्तव्यापासून मागे हटल्या नाहीत. त्यांचे जीवन हे प्रेरणेचा अखंड स्रोत आहे.रमाबाईंच्या आयुष्यातील संघर्ष समजून घेतल्यास आपल्याला समाजातील विषमता आणि अन्यायाची जाणीव होते. त्याचबरोबर संघर्षातून उभे राहण्याची प्रेरणाही मिळते. त्यांचे जीवन हे केवळ भूतकाळातील इतिहास नाही, तर वर्तमान आणि भविष्याला दिशा देणारा संदेश आहे.२७ मे हा दिवस रमाबाईंच्या स्मृतीला अभिवादन करण्याचा दिवस आहे. हा दिवस आपल्याला त्याग, प्रेम, सहकार्य आणि माणुसकीची आठवण करून देतो. बाबासाहेबांच्या महान कार्याच्या पायाभरणीत रमाबाईंचे योगदान सदैव स्मरणात राहील. त्यांच्या शांत, संयमी आणि समर्पित जीवनामुळेच भारतीय समाजपरिवर्तनाच्या इतिहासाला नवी दिशा मिळाली.रमाबाई आंबेडकर या भारतीय स्त्रीशक्तीचे एक तेजस्वी प्रतीक आहेत. त्यांचे जीवन जितके साधे होते, तितकेच ते महान होते. त्यांनी संकटांशी सामना करत समाजपरिवर्तनाच्या इतिहासात आपले अजरामर स्थान निर्माण केले. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करताना त्यांच्या जीवनमूल्यांचा स्वीकार करण्याची प्रतिज्ञा प्रत्येकाने केली पाहिजे. कारण रमाईंचा त्याग, त्यांचे प्रेम आणि त्यांचे समर्पण हेच खऱ्या अर्थाने मानवतेचे आणि सामाजिक न्यायाचे अधिष्ठान आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
ईमेल – bagate.rajendra5@gmail.com